महाराष्ट्र शासन
**ग्राम विकास विभाग**
**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय**
४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.

दूरध्वनी क्र.०२२-२७५६१८२४ / हेल्प लाईन क्र. १८०० २२ २०१९
Website-https://mahaawaas.com
Email ID-directoriayruralhousing@gmail.com

जा.क्र./रा.व्य.क.ग्रा.गृ/बांध/२००४/२०२२ दि: २८.०१.२०२२

प्रति,

**कार्यकारी अध्यक्ष,**
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा तथा
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
जिल्हा परिषद (सर्व)

**विषय** - प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत **जिल्हास्तरीय डेमो हाऊस** बांधकामाबाबत मार्गदर्शक सुचना..

**संदर्भ** - १. ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचेकडील दि.३ सप्टेंबर २०२० रोजीच्या डेमो हाऊसबाबत मार्गदर्शक सूचना

२. राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण पत्र क्र.जा. क्र./रा.व्य.क.ग्रा.गृ/बांध/९८२/२०२१ दि.०६.१०.२०२१

३. ग्राम विकास विभाग यांचेकडील महा आवास अभियान- ग्रामीण २.० अंतर्गत शासननिर्णय क्र.: प्रआयो-२०२१/प्र. क्र.९७/योजना-१०, दि. १६ नोव्हेंबर २०२१

केंद्र शासनाने "सर्वांसाठी घरे-२०२२" हे धोरण जाहीर केले असुन त्यानुसार राज्यातील ग्रामीण भागामध्ये बेघर घटकांसाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व इतर राज्य पुरस्कृत योजना राबविण्यात येत आहेत. योजनांतर्गत लाभार्थ्यांना घरकुल डिझाइन टायपोलॉजीच्या योग्य आकलनासाठी, अशा प्रकारे बांधलेली प्रात्यक्षिक घरे (Demo Houses) त्यांच्या भेटीसाठी उपलब्ध असणे आवश्यक आहे.

महाआवास अभियानाच्या पहिल्या टप्प्यामध्ये संदर्भ क्र.१ अन्वये संपूर्ण राज्यात तालुकानिहाय डेमो हाऊसचे बांधकाम पंचायत समिती आवारामधे करण्यात आले आहे. तालुकास्तरीय डेमो हाऊसेस हे पारंपारिक पद्धतीने बांधण्यात आल्यामुळे त्यातून लाभार्थ्यांना नाविन्यपूर्ण, अपारंपारिक,नवनवीन तंत्रज्ञान इत्यादीबाबत मार्गदर्शन मिळण्यास मर्यादा येत आहेत. याचाच पुढील भाग म्हणून संदर्भ क्र.२ अन्वये महाआवास अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये संपूर्ण राज्यात प्रतिजिल्हा एक याप्रमाणे एकूण ३४ डेमो हाऊसचे डिझाईन

करणे व डेमो हाऊसकरिता जागा निश्चिती करणेबाबत कळविण्यात आले आहे. सदर पत्रामध्ये जिल्हा डेमो हाऊसचा प्रस्ताव प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेकरिता या कार्यालयास सादर करणेबाबत सूचित करण्यात आले होते.

तथापि ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचेकडील मार्गदर्शक सुचनांनुसार कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद यांची नेमणूक प्रकल्प अंमलबजावणी संस्था (Project Implementing Agency) म्हणून करण्यात आलेली असल्याने प्रशासकीय व तांत्रिक मान्यता जिल्हास्तरावरूनच देता येईल. तथापि प्रस्तावित जिल्हा डेमो हाऊसचा प्रस्ताव राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयास फक्त अवलोकनार्थ सादर करण्यात यावा, जेणेकरून प्रस्तावित जिल्हा डेमो हाऊसमध्ये नाविन्यपूर्ण, अपारंपारिक, नवनवीन तंत्रज्ञान या बाबींचा समावेश असल्याची या कार्यालयाची खात्री होईल.

राज्यात संदर्भ क्र.३ अन्वये 'महाआवास अभियान २.०' अंतर्गत राज्यातील जिल्हा डेमो हाऊस पूर्ण करावयाची आहेत. त्यानुषंगाने मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत. सदर मार्गदर्शक सुचनांच्या आधारे आपल्या जिल्हास्तरावरील डेमो हाऊस पूर्ण करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

सोबत-

१. जिल्हा डेमो हाऊस बांधकामबाबत मार्गदर्शक सुचना
२. परिशिष्ट-१-बांधकाम विषयक विकसित तंत्रज्ञानाचा मार्गदर्शनपर तक्ता
३. परिशिष्ट-२-उपक्रम आणि जबाबदाऱ्यांचे मार्गदर्शनपर वेळापत्रक

**(डॉ. राजाराम दिघे)**
संचालक
राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण
महाराष्ट्र राज्य

प्रतिलिपी:

१) मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामीण विकास विभाग, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) मा. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, सर्व यांना माहितीस्तव सादर.
३) उपआयुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय, सर्व यांना माहितीस्तव सादर.
४) प्रकल्प संचालक,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (सर्व) यांना माहिती व तात्काळ कार्यवाहीस्तव.

## १. <u>प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत जिल्हास्तरीय डेमो हाऊस बांधकाम</u>

मार्गदर्शक सुचना-२०२२

केंद्र शासनाने "सर्वांसाठी घरे-२०२२" हे धोरण जाहीर केले असुन त्यानुसार राज्यातील ग्रामीण भागामध्ये बेघर घटकांसाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व इतर राज्य पुरस्कृत योजना राबविण्यात येत आहेत. या योजने अंतर्गत घरे बांधत असताना हाऊस डिझाइन टायपोलॉजीज आणि अत्याधुनीक तंत्रज्ञानाचा वापर करणे, त्यांना सामाजिक व सांस्कृतिक दृष्ट्या सक्षम बनवणे, बांधकाम खर्च कमी करणे, नैसर्गिक आपत्तीचा सामना करण्यासाठी सक्षम करणे, उच्च प्रतीचे व पर्यावरणपूरक बांधकाम करणे याचा प्राधान्याने विचार करणे आवश्यक आहे.

योजनांतर्गत लाभार्थ्यांना घरकुल डिझाइन टायपोलॉजीच्या योग्य आकलनासाठी, अशा प्रकारे बांधलेली प्रात्यक्षिक घरे (Demo Houses) त्यांच्या भेटीसाठी उपलब्ध असणे आवश्यक आहे. याचाच एक भाग म्हणून राबविण्यात आलेल्या महाआवास अभियान टप्पा १ मध्ये संपूर्ण राज्यामध्ये तालुकानिहाय डेमो हाऊसचे बांधकाम पंचायत समिती आवारामधे करण्यात आले आहे. महाआवास अभियान टप्पा २ अंतर्गत जिल्हास्तर डेमो हाऊसची निर्मिती करण्यात येणार आहे. सदर अभियानामध्ये प्रतिजिल्हा एक याप्रमाणे राज्यात एकूण ३४ डेमो हाऊस पूर्ण करण्याबाबत प्रस्तावित करण्यात आले आहे. सदर डेमो हाऊस जिल्हास्तरावर प्रात्यक्षिक घरकुल (District Demo House) म्हणुन लाभार्थ्यांना भेट देण्यासाठी उपलब्ध करुन देता येईल.

**<u>डेमो हाऊस डिझाइन :-</u>**

- जिल्ह्यास्तरावरील डेमो हाऊस डिझाईन करण्याकरिता पुढीलप्रमाणे समिती गठित करण्यात यावी-
  १.उपअभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद (तांत्रिक अधिकारी)
  २.आयआयटी मुंबईमार्फत प्रशिक्षित मास्टर ट्रेनर्स- १ जिल्हास्तर अभियंता आणि २ ग्रामीण गृहनिर्माण अभियंता (RHE)
  ३. जिल्ह्यातील सर्वोत्कृष्ट शासकीय-स्थापत्य अभियांत्रिकी / वास्तुशास्त्र महाविद्यालयाचा सहभाग घेण्यात यावा अथवा जिल्ह्याने प्रस्तावित केलेल्या बांधकाम तंत्रज्ञानातील तज्ञ संस्थेचे तांत्रिक मार्गदर्शन घेण्यात यावे

  सदर समितीने आपल्या जिल्ह्याच्या स्थानिक भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास करून सदर डेमो हाऊसचे डिझाईन व अंदाजपत्रक तयार करावे.

- जिल्ह्यांतील स्थानिक भौगोलिक परिस्थितीचा विचार करुन उतरत्या छताचे अथवा सपाट छताचे यांपैकी कोणत्या एका प्रकारचे डेमो हाऊस बांधकाम करणे आवश्यक आहे, या बाबतचा निर्णय जिल्हास्तरावर घेण्यात यावा.
- कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद हे डेमो हाऊस डिझाइनच्या आराखडयास मान्यता (Validation) देण्यासाठी सक्षम राहतील. उपअभियंता, बांधकाम, जिल्हा परिषद यांनी त्यांच्या जिल्हयासाठीच्या

योग्य डेमो हाऊस डिझाईनच्या मान्यतेचा सविस्तर प्रस्ताव (प्लॅन, एलेवेशन, सेक्शन आणि Structural Drawing, अंदाजपत्रक इत्यादी) संबंधित कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद यांचेकडे प्रमाणिकरण (Validation) करणेकरीता सादर करून मान्यता घ्यावी व सदर मान्यता प्राप्त प्रस्ताव राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयास अवलोकनार्थ सादर करण्यात यावा, जेणेकरून सदर डेमो हाऊसमध्ये नाविन्यपूर्ण, अपारंपारिक,नवनवीन तंत्रज्ञान या बाबींचा समावेश समावेश केल्याची खात्री होईल.

- डेमो हाऊस घरकुल बांधकाम क्षेत्र हे कमीत कमी २६९ चौ. फुट ते जास्तीत जास्त ३०० चौ. फुट क्षेत्रफळाच्या मर्यादेत असावे. डेमो हाऊस डिझाईन करताना त्यामध्ये पुढील बाबींचा प्रामुख्याने विचार करण्यात यावा- जिल्ह्याची स्थानिक भौगोलिक परिस्थिती (Geo-climatic conditions), सामाजिक-सांस्कृतिक परिस्थिती (Socio-cultural conditions), स्थानिक पातळीवर उपलब्ध बांधकाम साहित्य (Locally available construction materials),नाविन्यपूर्ण व अपारंपारिक तंत्रज्ञान, नवनवीन बांधकाम संकल्पना, भूकंप प्रतिरोधक, नैसर्गिक आपत्तीरोधक आणि पर्यावरण पूरक असे डिझाईन विकसित करण्यात यावे.
- बांधकाम विषयक विकसित तंत्रज्ञानाचा मार्गदर्शनपर तक्ता परिशिष्ट-१ मध्ये देण्यात आला असून त्यामधील आपल्या जिल्ह्याच्या स्थानिक भौगोलिक परिस्थितीला समरूप अश्या तंत्रज्ञानाच्या आधारे डेमो हाऊस बांधकाम करू शकता.

**<u>डेमो हाऊस करीता जागा निश्चिती :-</u>**

- डेमो हाऊसची जागा प्राधान्याने **जिल्हा परिषद कार्यालय** तसेच **जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा** कार्यालयाच्या प्रांगणातच निश्चित करावी.
- जिल्हा परिषद कार्यालय अथवा जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयाच्या प्रांगणात जागा उपलब्ध होत नसल्यास जिल्हा मुख्यालयाचे ठिकाणी असलेल्या पंचायत समितीच्या प्रांगणातील जागेला प्राधान्य द्यावे. उपरोक्त ठिकाणी जागा उपलब्ध न झाल्यास अन्य पर्यायी शासकीय जागा तसेच नजिकच्या मोठया ग्रामपंचायतीमध्ये दर्शनी भागात जर जागा उपलब्ध असेल तर त्या ठिकाणी जागा निश्चित करावी, मात्र भविष्यात सदर डेमो हाऊस पूर्ण झाल्यानंतर त्याचा वापर जिल्हा माहिती कक्ष म्हणुन करता येऊ शकेल, अशी ती जागा असावी.
- डेमो हाऊसचे ठिकाण हे लाभार्थ्यांना भेट देण्यासाठी सोयीस्कर असावे व निवडलेली जागा ही उंचसखल भागावरील असावी (खड्डयात किंवा दलदलीची नसावी.)
- डेमो हाऊससाठी निवडलेली जागा भरणी केलेल्या ठिकाणची नसावी तसेच निवड केलेल्या जागेच्या ठिकाणचा भूजलस्तर (Ground Water level) हा पूरेसा खाली असावा. डेमो हाऊससाठी निवडलेली जागा ही वाहने तसेच पादचारी यांना वावरता येईल अशा ठिकाणी असावी.
- डेमो हाऊससाठी निवडलेली जागा ही पुरेशी (किमान ५०० चौ. फुट) असावी, जेणेकरुन आजूबाजूच्या इमारतींमुळे या ठिकाणी आवश्यक असणाऱ्या व्हेंटीलेशन तसेच प्रकाश इत्यादीवर परिणाम होऊ शकणार नाही. निवडलेली जागा ही अशी असावी की जेणेकरुन पाणीपुरवठा, मलनि:सारण व्यवस्था, विद्युत पुरवठा, टेलीफोन लाईन इत्यादी आवश्यक सुविधा कमीत कमी खर्चात उपलब्ध होऊ शकतील.

**<u>प्रकल्प अंमलबजावणी संस्था PIA (Project Implementing Agency) :-</u>**

- केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार डेमो हाऊस बांधकामासाठी जिल्हास्तरावरील शासकीय यंत्रणा कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद या पर्यायाची प्रकल्प अंमलबजावणी संस्था म्हणुन निश्चिती केली आहे. त्यानुसार डेमो हाऊस बांधकामासाठी कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद ही प्रकल्प अंमलबजावणी संस्था (PIA) म्हणून राहतील.
- डेमो हाऊस बांधकामाकरीता पूर्ण वेळ पर्यवेक्षकाची नियुक्ती करून उपअभियंता,जिल्हा परिषद, आयआयटी मुंबईमार्फत प्रशिक्षित एक जिल्हास्तर अभियंता आणि २ ग्रामीण गृहनिर्माण अभियंता (RHE) यांच्या मदतीने प्रस्तावित डेमो हाऊसचे डिझाईन, अंदाजपत्रक, BOQ (Bill of Quantities) तयार करून घेऊन प्रमाणीकरण (Validation) करणे.
- प्रमाणीकरण झाल्यानंतर मंजूर प्रस्तावाप्रमाणे प्रस्तावित जागी डेमो हाऊस बांधकाम सुरू करून घेणे. समितीच्या मदतीने बांधकाम साहित्य, मजूर, उपकरणे व बांधकामासाठी आवश्यक यंत्रसामुग्री (T&P) उपलब्ध करुन घेणे.
- ग्रामीण गवंडी प्रशिक्षणासाठी नियुक्त करण्यात आलेल्या प्रशिक्षण संस्थांच्या (TP) मदतीने डेमो हाऊस बांधकामाच्या ठिकाणी गवंडी प्रशिक्षण कार्यक्रम राबवता येऊ शकेल.
- डेमो हाऊस बांधकाम मार्गदर्शक सुचनांच्यानुसार डेमो हाऊस बांधकाम फिनिशिंग सहित पूर्ण करून दस्तऐवजीकरण, प्रकल्प अहवाल इत्यादींचे संच उपअभियंता, जिल्हा परिषद यांनी 'मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद' यांचेकडे सुपूर्द करावा.
- परिशिष्ट-२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे डेमो हाऊसचे बांधकाम विहित कालमर्यादेत पूर्ण करणे.

**<u>डेमो हाऊस बांधकामाकरीता निधीची तरतूद व वितरण व्यवस्था :-</u>**

- केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत प्रशासकीय निधीमधून सदर उपक्रमासाठी खर्च करता येईल. सदरचा खर्च हा Administrative Head - Evaluation and Research, Administrative Sub Head- Proto Type of House Design Typologies या लेखा शिर्षाखाली खर्च करण्यात यावा ( गवंडी प्रशिक्षणाचा खर्च वगळून ).
- डेमो हाऊस बांधकामाकरीता खर्च अधिकतम **रु.१,४०,०००/-** सपाट प्रदेशाकरीता तसेच **रु. १,५०,०००/-** डोंगरी क्षेत्राकरीता करता येईल.
- याव्यतिरिक्त रेन वॉटर हार्वेस्टिंग, लॅम्प पोस्ट, परसबाग, डेमो घरकुल माहिती फलक, आकस्मिक निधी, डेमो  हाऊस बांधकामासाठी नियुक्त तांत्रिक अधिकारी यांचे TA/DA, इत्यादी सुविधांकरिता **रू. ५०,०००/-** पर्यंत खर्च करता येईल.
- याव्यतिरिक्त डेमो हाऊस बांधकामामध्ये राबविण्यात येणाऱ्या ग्रामीण गवंडी प्रशिक्षणासाठी ग्रामीण गवंडी प्रशिक्षणाकरीता ठेवलेल्या तरतुदीतून गरज असल्यास पुढील प्रमाणे खर्च करता येईल.

अ) प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेस (TP) अदा करावयाची रक्कम —

रु. ३८.५० X ८ तास X ४५ दिवस = रु. १३,८६० /- प्रती गवंडी,

एकूण = १३,८६० X ५ (गवंडी) = **रु. ६९,३०० /-**
(यापैकी ३०% रक्कम अग्रिम स्वरुपात व उर्वरित ७०% रक्कम गवंडी प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर अदा करता येईल)

ब) प्रशिक्षणार्थी गवंडी मानधन-५ गवंडी X रु.३५० X ४५ दिवस = रु. ७८,७५० /-
क) प्रशिक्षणार्थी गवंडी मूल्यमापन फी -रु. १२०० प्रती गवंडी X ५ गवंडी = रु.६०००/-
ड) उत्तीर्ण प्रशिक्षणार्थी गवंडी यास द्यावयाचे टुल किट- रु. १२०० प्रती गवंडी X५ गवंडी = रु.६०००/-

एकूण = ६९,३०० + ७८,७५० + ६००० + ६०००
गवंडी प्रशिक्षणाकरीताचा एकूण खर्च = **रु. १,६०,०५०/-** प्रती डेमो हाऊस

**प्रती डेमो हाऊस उपलब्ध होऊ शकणारा निधी -**
१.सपाट प्रदेशाकरीता = १,४०,००० + ५०,००० + १,६०,०५० = **३,५०,०५०**/-
२.डोंगरी क्षेत्राकरीता = १,५०,००० + ५०,००० + १,६०,०५० = **३,६०,०५०**/-

- उपरोक्त निधी व्यतिरिक्त आवश्यकता असल्यास डेमो हाऊसच्या Value Addition करिता लागणारा अतिरिक्त निधी पंचायतराज संस्था, कॉर्पोरेट संस्था, स्वयंसेवी संस्था, लोकसहभाग इत्यादीकडून उपलब्ध करुन घेता येऊ शकेल.
- प्रकल्प अंमलबजावणी संस्थेने डेमो हाऊस बांधकामासाठी खरेदी केलेले साहित्य, तसेच मजुरी यासाठीची देयके विहित कार्यपध्दतीद्वारे प्रकल्प संचालक यांचेकडे सादर करावीत. प्रकल्प संचालक व सहाय्यक लेखाधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांच्या डिजीटल स्वाक्षरीने **AFMS** प्रणालीव्दारे सदरची देयके थेट पुरवठा दार/मजुर यांना अदा करण्यात यावीत, तसेच डेमो हाऊस बांधकामाकरिता AFMS मधील उपलब्ध निधी मधून तरतूद करण्यात यावी.

**डेमो हाऊस बांधकामाचा दर्जा, संनियंत्रण आणि देखभाल दुरुस्ती :-**

- उपअभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद व मास्टर ट्रेनर्स यांनी दैनंदिन भेट देऊन डेमो हाऊस बांधकामाची गुणवत्ता तपासावी. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांनी डेमो हाऊस बांधकामास वेळोवेळी भेट द्यावी.
- विभागस्तरावरील अधिकारी यांनी आपल्या विभागातील जिल्हानिहाय डेमो हाऊस बांधकामास कामाचा दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने वेळोवेळी भेटी देऊन मार्गदर्शन करावे.
- डेमो हाऊसचे बांधकाम पुर्ण झाल्यावर सदर इमारतीची नोंद बांधकाम विभागाने त्यांचे मालमत्ता रजिस्टरला घ्यावी. सदर डेमो हाऊसची नोंद बांधकाम विभागाचे मालमत्ता रजिस्टरला असल्याने डेमो हाऊसच्या देखभाल दुरुस्तीची जबाबदारी संबंधीत जिल्हा परिषदची राहिल

**डेमो हाऊस बांधकामाची प्रचार, प्रसिध्दी आणि प्रकल्पांतर्गत उपक्रम :-**

- ग्रामपंचायतीमार्फत सर्व लाभार्थी आणि योजनेशी संबंधितांना डेमो हाऊस दाखविण्याची व्यवस्था करावी. डेमो हाऊस बाबतची माहिती लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहचविण्यासाठी प्रशासनाने आवश्यक त्या उपाययोजना उदा. जाहिरात, होर्डिंग, बॅनर, इत्यादीद्वारे प्रभावी प्रचार व प्रसिध्दी करावी. डेमो हाऊसच्या प्रचार आणि प्रसिध्दीसाठी त्या ठिकाणी शासकीय / सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे.
- डेमो हाऊसमध्ये अभिप्राय पुस्तिका तसेच लाभार्थी आणि भागधारकांच्या भेटींची नोंद ठेवणेकरिता अभिलेख नोंदवही सदर डेमो हाऊसमध्ये ठेवण्यात यावी.
- डेमो हाऊसच्या धर्तीवर जिल्ह्यातील घरकुल बांधकामे होणे अपेक्षित असल्याने बांधकाम सुरु असताना वेगवेगळ्या टप्प्याचे प्रत्यक्ष बांधकामाचे स्वयंस्पष्ट फोटो (Photo) घेऊन आपापल्या जिल्हा तसेच विभागीय स्तरावरील व्हाटस ऍप ग्रुप व इतर माध्यमांतून संबंधीताना दाखवावे. डेमो हाऊस बांधकामाचे विविध टप्प्यांचे चलचित्रिकरण (Video Shooting) करुन महत्वाच्या कार्यक्रमांच्या ठिकाणी त्याचे सादरीकरण आणि प्रक्षेपण करण्यात यावे. लाभार्थ्यांना डेमो हाऊस बाबत मार्गदर्शन करून त्या धर्तीवर घरकुलांचे बांधकाम करण्यास प्रवृत्त करावे.
- डेमो हाऊसचा उपयोग घरकुलाच्या लाभार्थ्यांना प्रात्यक्षिक (डेमो) दाखविणे व पूर्ण केलेल्या डेमो हाऊसचा उपयोग जिल्हा माहिती कक्ष / कॉप शॉप म्हणुन करता येईल.

तरी या मार्गदर्शक सुचनांच्या आधारे प्रत्येक जिल्ह्यातील ‘जिल्हा डेमो हाऊस’ बांधकामाची कार्यवाही पूर्ण करण्यात यावी.

## परिशिष्ट-१

## Construction Technologies (मार्गदर्शनपर बांधकामविषयक विकसित तंत्रज्ञान)

1. Using locally available materials (स्थानिक पातळीवर उपलब्ध बांधकाम साहित्याचा वापर)
2. Low cost/ Cost effective Construction (किफायतशीर बांधकाम तंत्रज्ञान)
3. Vernacular Architecture (स्थानिक बांधकाम विषयक वास्तुशास्त्र)
4. Precast Construction Technology (तयार केलेले बांधकामाचे संरचनात्मक घटक उदा. Column, Beam, Slab and walls इ. बांधकामाच्या जागी एकमेकाना जोडून घराचे बांधकाम)
5. Earthquake Resistant Structures for earthquake prone areas and Cyclone resistant Structures for coastal areas
   (भूकंप प्रतिरोधक, नैसर्गिक आपत्तीरोधक व किनारी भागासाठी चक्रीवादळ प्रतिरोधक संरचना)
6. Eco / environmentally friendly Structures (पर्यावरण पूरक घरकुल बांधकाम)
7. Using Fly ash bricks or Compressed Stabilized Earthen Blocks (CSEB) (बांधकामामध्ये फ्लाय अॅश वीट आणि CSEB विटांचा वापर)
8. Rat trap bond masonry Structures (भिंतीच्या बांधकामामध्ये रॅट-ट्रॅप बॉन्ड पद्धतीचा वापर)

9. Solid / Hollow Bricks (भिंतीच्या बांधकामामध्ये भरीव / पोकळ विटांचा वापर)
10. Using Bamboo and bamboo Corrugated Sheets (बांधकामामध्ये बांबू आणि त्यापासून बनलेल्या घटकांचा समावेश)
11. Interlocking bricks (भिंतीच्या बांधकामामध्ये मॉर्टरचा वापर न करता इंटरलॉकिंग विटांचा वापर)
12. Using Alternatives for sand like Crush Sand, Bagasse Ash and Lime (वाळूला पर्यायी बांधकाम साहित्याचा वापर)
13. Laterite Stone structures (चिरा दगड वापरुन बांधकाम)
14. Using Wood (बांधकामामध्ये लाकूड आणि त्यापासून बनलेल्या घटकांचा समावेश)
15. Natural Stone Structures (बांधकामामध्ये दगड, ग्रेनाइट आणि बसाल्टचा वापर)
16. Exposed brick structures (वीटकामाला प्लास्टर/गिलावा न करता भिंतीना मजबूत/आकर्षक बनवणे)
17. Filler slab (छताच्या बांधकामामध्ये फिलरस्लॅब तंत्रज्ञानाचा वापर)
18. Tribal or cultural indicative houses (आदिवासी भागातील घरकुल बांधकाम प्रतिकृति)
19. Complete House with-
Solar panel, Kitchen Garden, Rain water harvesting, Drainage system, Gas connection, Paint Flooring and kitchen platform
(सौर ऊर्जा, परसबाग, पावसाच्या पाण्याची साठवण अथवा जलपुनर्भरण, सांडपाणी व्यवस्था, गॅस जोडणी, रंग रंगोटी, किचनओटा इ. सहित पूर्ण घरकुल)

## परिशिष्ट-२

**उपक्रम आणि जबाबदाऱ्यांचे मार्गदर्शनपर वेळापत्रक**

| अ.क्र | उपक्रम | वेळापत्रक (आठवड्यांमध्ये) | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | डेमो हाऊस डिझाइन व अंदाजपत्रके प्रमाणीकरण करणे | P | | | | | | | | | | | |
| २ | प्रकल्प अंमलबजावणी संस्था (PIA) यांनी BOQ बनवणे | P | | | | | | | | | | | |
| ३ | बांधकाम साहित्य खरेदी करणे तसेच बांधकाम करिता लागणारे अवजारे व हत्यारे उपलब्ध करून घेणे | P | P | | | | | | | | | | |
| ४ | डेमो होऊसचे बांधकाम करणे | | | P | P | P | P | P | P | P | | | |
| ५ | फिनिशिंग सहित इतर अनुषंगिक कामे पूर्ण करणे | | | | | | | | | | P | P | P |
| ६ | बांधकाम पुर्ण झाल्यानंतर बांधकामासंबंधीचा प्रकल्प अहवाल व दस्ताऐवज उपअभियंता यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे सुपूर्द करणे | | | | | | | | | | | | P |